| | | |
|---|---|---|
| Date | : 20th June, 2007 | www.mutualpr.com |
| Publication | : SanjWartha | |
| Center | : Pune | |
| Page No | : 04 | |
| Client Name | : Vatika Group | |

# वाटीका समूहाचे पुण्यात अद्ययावत बिझनेस सेंटर

पुणे : वाटीका ग्रुप या उत्तर भारतातील रिअल इस्टेट आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने त्यांच्या पुण्यातील विस्तारीकरणाची योजना जाहीर केली असून आयटी शहर म्हणून उभरत्या या शहरात त्यांचे पहिले बिझनेस सेंटर सुरू करण्यात येत आहे.

याद्वारे कंपनीने त्यांच्या भारतातील विस्तारीकरणाला सुरूवात केली असून भविष्यात कंपनीच्या वतीने अशाच स्वरूपांच्या काही प्रकल्पांची घोषणा केली जाणार असल्याची शक्यता आहे. हे सादरीकरण होत असतानाच कंपनीने अशाच स्वरूपाचे बिझनेस सेंटर हैद्राबादमध्ये सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे.

या प्रसंगी बोलताना वाटिका ग्रुपचे मार्केटिंग व ऑपरेशन्सचे संचालक गौरव भल्ला म्हणाले की, जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दृष्टीकोनातून होणारी भारताची वाटचाल पाहता, हा प्रगतीचा वेग कायम राखण्यासाठी भारताला तांत्रिक पायाभूत सुविधांचे पाठबळ असणे आवश्यक आहे. भारतातील पायाभूत सुविधांचा दर्जा उच्च दर्जावर नेण्याची गरज आहे.

पुण्यातील वाटीका बिझनेस सेंटर हे ३२ हजार चौरस फूट जागेत उभारण्यात आले असून ते येरवड्यातील पंचशील टेक पार्क वन टॉवर सीमध्ये पाचव्या मजल्यावर सुरू करण्यात आले आहे. हे केंद्र ३२३ आसनक्षमतेचे असून त्यात सिंगल सिटरपासून ते २० सीटर्सपर्यंतचे प्रकार आहेत तसेच १० बैठकीच्या खोल्या आणि कॉन्फरन्स रूमचा समावेश आहे.वाटिका ग्रुपचे पुण्यापाठोपाठ असेच बिझनेस सेंटर हैद्राबादमध्ये सुरू करण्याची योजना आखली आहे.

हैद्राबादमधील केंद्र २४ हजार चौरस फूट जागेत असून हैद्राबादेतील बंजारा रस्त्यावरील एनएसएल आयकॉनमध्ये दुसऱ्या मजल्यावर ते आहे. हे केंद्र २५७ आसनक्षमतेचे असून त्यातही सिंगल सिटरपासून ते २० सीटपर्यंत असून ९ मिटिंग रूम्स आणि कॉन्फरन्स रूमचा समावेश आहे.

VATIKA GROUP STEPS INTO PUNE WITH OF A STATE-OF- THE ART BUSINESS CENTRE

**Vatika Group, the leading real estate and Hospitality Company in North India, has today announced its expansion into Pune with the launch of its first Business Centre, in the upcoming IT City. This marks the company's plans for expanding across India and the group will be announcing more such projects in the near future. Close to the heels of this launch, the group plans to launch another such business centre in Hyderabad.**

**Speaking on the occasion** Mr. Gaurav Bhalla, Director Marketing and Operations, Vatika Group **said, "With India's fast pace movement towards being largest global economy; India needs to be equipped with the technological infrastructure to support the pace". "With immense demand for such infrastructure in India, we seek to be the first movers in this realty segment and lead Infrastructure in India to the higher levels" he added.**

**Vatika Business Centre, Pune** occupies 32,000 square feet of area, encompassing the entire 5th floor of Tower C of Panchshil Tech Park One, Yerawada, Pune. The business centre offers 323 seaters in various combinations ranging from single seater to 20 seaters and 10 meeting rooms and a conference room.

The property in Hyderabad occupies 24,000 square feet of area, encompassing the entire 2nd floor of NSL Icon, Banjara Road, Hyderabad. The business centre would offer 257 seaters in various combinations ranging from single seater to 20 seaters and 9 meeting rooms and a conference room.